Exh. 32/B

रे.क.नं. ०५/२०२६

# मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल
## यांचे कोर्टात...

सुनिल नारायण कांबळे ..... वादी

विरूध्द

३) सुजाता चंद्रकांत कांबळे ..... प्रतिवादी

यातील प्रतिवादी नं. ३ तर्फे वादीचे दावेस कैफियत व नि. ५ चे अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे–

order
-------
R&R

१) यातील वादीचा दावा खोटा, लबाडीचा व आपमतलबीपणाचा आहे. तो प्रस्तुत प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. प्रस्तुत प्रतिवादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

२) वादीने दाखल केलेला दावा व नि. ५ चे अर्जामधील नमुद सर्व मजकूर चुकीचा व खोटा आहे, प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य नाही.

३) वादीनी दाखल केलेला आहे असा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज कायदेशीर तरतुदीनुसार चालणेस पात्र नाही.

08/04/2026
Assistant Superintendent

४) वादीचे दावेमध्ये आवश्यक पक्षकार नमुद नाहीत. त्यामुळे सदर दावेस (Non- Joinder of Necessary Parties) ची बाधा निर्माण होत असलेने वादीचा दावा फेटाळणेस पात्र आहे.

५) वादीने सदर दावेकामी बरीचशी सत्य वस्तुस्थिती या मे. कोर्टापासून लपवून ठेवलेली आहे. (Supression of Material of Facts) त्यामुळे वादीचा दावा व मनाई अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

६) वादीचे दावेतील व नि. ५ अर्जामधील कलम (१) मधील दावा मिळकतीचे वर्णन मोघम, संदिग्ध व अपुर्ण आहे त्यामुळे सदरचा दावा कायदयाने चालणेस पात्र नाही.

७) वादीचे दावेतील व नि. ५ अर्जामधील कलम (२) मधील मजकूर, "वादी यांनी दावा मिळकत ही दि. १७/०१/२०१५ ...................... ...................... ते ........................................ तेथे प्रतिवादी नंबर १ यांनी देखील घर बांधले होते." हा सर्व चुकीचा व खोटा आहे, प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य नाही.

८) वादीचे दावेतील व नि. ५ अर्जामधील कलम (३) मधील मजकूर, "सदर वादी, प्रतिवादी नंबर १ ........................................ ते ........................................ दावा मिळकत मोकळी ठेवलेली आहे." हा सर्व चुकीचा व खोटा आहे, प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य नाही.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,

९) वादीचे दावेतील व नि. ५ अर्जामधील कलम (४) मधील मजकूर, "सदर वादी यांचे लगत हिस्सेदार .............................................. ते .............................................. प्रतिवादी यांचेविरूध्द सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे." हा सर्व चुकीचा व खोटा आहे, प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य नाही.

१०) वादीचे दावेतील कलम (५) मधील नमुद दावेस कारण चुकीचे, खोटे व लबाडीचे आहे. वादीचे दावेस व मनाई अर्जास काहीही कारण घडलेले नाही जे घडले म्हणून नमुद केले आहे ते साफ चुकीचे व खोटे आहे.

११) वादीचे दावेमधील कलम (६ व ७) मधील नमुद दावेचा तपशिल व आकारणी चुकीची आहे.

१२) वादीचे दावेमधील कलम (८, १८ व १९) मधील नमुद मजकूर चुकीचा व खोटा आहे.

१३) वादीचे तुर्तातुर्त मनाई अर्जामधील कलम (५) मधील नमुद अर्जास कारण चुकीचे, खोटे व लबाडीचे आहे. वादीचे दावेस व मनाई अर्जास काहीही कारण घडलेले नाही जे घडले म्हणून नमुद केले आहे ते साफ चुकीचे व खोटे आहे.

१४) वादीचे नि. ५ चे अर्जामधील कलम (६ व ९) मधील नमुद मजकूर चुकीचा व खोटा आहे.

Chndale
08/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

१५) वादीचे दावेमधील व नि. ५ अर्जामधील विनंती कलमामध्ये वादी ज्या स्वरूपाचे दादी याकामी मागणी करीत आहेत तशा दादी त्यांना याकामी मागता येणार नाहीत. अगर कायदेशीर तरतुदीनुसार देवविताही येणार नाहीत.

१६) प्रस्तुत प्रतिवादी याकामी वादीचे दावेमधील व मनाई अर्जामधील नमुद सर्व कथने, आरोप व मजकूर स्पष्टपणे नाकारीत असून अगर अनावधानाने किंवा नजरचुकीने काही मजकूर अगर कथने नाकारणेची राहून गेली असलेस ती सुध्दा याकामी प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारली आहेत असे समजणेत यावे.

१७) यातील वादींनी केलेला दावा कायदयाने चालणेस पात्र नसून वादींनी सदरकामी वादींनी प्रतिवादी नं. ३ या सहहिस्सेदार यांचेविरूध्द मनाई सोबत कोणतीही अनुषंगीक, परिणामी न्यायीक (Consequential Equitable Relief) मालकी घोषीत करून मिळणेबाबत दाद मागितलेली नसलेने सदरचा दावा कायदयाने चालणेस पात्र नाही त्यामुळे सदर दावेमध्ये दाखल केलेला नि. ५ चा अर्जही कायदयाने चालणेस पात्र नाही. त्यामुळे सदरचा दावा व नि. ५ चा अर्ज फेटाळून लावणे न्यायाचे व गरजेचे आहे.

१८) <u>**सदर कामी सत्य वस्तुस्थिती अशी की**</u>,

अ) प्रस्तुत कामी यातील वादी व प्रतिवादी नं. ३ हे एकाच कुटूंबातील असून यातील वादी हे प्रतिवादी नं. ३ यांचे दिर आहेत. प्रस्तुत प्रतिवादी

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

नं. ३ यांनी सदर गट नं. ७१४ पैकी क्षेत्र हे. ०.०१ आरचे क्षेत्र मिळकतीचे मुळ मालक म्हणजेच प्रतिवादी नं. ४ उदयसिंह जयसिंगराव घोरपडे यांचेकडून रजि. दस्त नं. १२४९/२०२१ ने अन्य खरेदीदार वगैरे १६ यांचेसोबत समाईकामध्ये खरेदी केलेली आहे सदर खरेदीतारखेपासून सदर दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी प्रतिवादी नं. ३ यांचे मालक व कब्जेवहिवाटदार म्हणून नाव नोंद होते व आहे.

आ) वास्तविकता यातील प्रतिवादी नं. ३ यांचे पती चंद्रकांत कांबळे हे सदर गट नं. ७१४ मध्ये कुळ होते. त्याप्रमाणे सदर गट नं. ७१४ मध्ये त्यांचे क्षेत्र हे. ०.०१ आर क्षेत्रामध्ये कायदेशीर कब्जेवहिवाट होती. सदर प्रतिवादी नं. ३ यांचे पती चंद्रकांत यांनी सदर मिळकतीमध्ये पुर्वीच घर बांधकाम केलेले होते त्याप्रमाणे सदरचे घर ग्रामपंचायत कापशी सदरी नोंद झालेले होते व आहे. सदर प्रतिवादी नं. ३ यांचे पती चंद्रकांत कांबळे हे मयत झालेनंतर त्यांचे पश्चात रजि. दस्त नं. १२४९/२०२१ करतेवेळी सदरचे क्षेत्र हे. ०.०१ आर प्रतिवादी नं. ३ यांचे नावे खरेदी करणेत आलेले होते व आहे. सदर खरेदी मिळकतीमध्ये असणारे प्रतिवादी नं. ३ यांचे साधे घर हे सन. १९९८ मध्ये त्यांचे पती चंद्रकांत यांनी बांधलेले होते.

इ) प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांचे गट नं. ७१४ मधील खरेदी घेतलेल्या क्षेत्र हे. ०.०१ आर जागेमध्ये असणारे त्यांचे जुने घर हे मोडकळीस व पडसर झालेने त्यांना नाईलाजास्तव नविन घराचे बांधकाम करणे गरजेचे

08/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

आहेत. त्यामुळे त्यांनी ग्रामपंचायत कापशी यांचेकडे घरकुलासाठी अर्ज करून शासकीय नियमाप्रमाणे प्रतिवादी नं. ३ हे घरकुलासाठी पात्र ठरलेनंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये आपले घराचे बांधकाम सुरू केले होते. तदनंतर प्रस्तुत वादी यांनी त्यास तक्रार केली होती त्यावेळी प्रतिवादी नं. ३ यांनी खरेदीपत्रानुसार व जुन्या घराचे हद्दीप्रमाणे बांधकाम करत असलेचे सांगितले होते, तरी देखील प्रस्तुत वादी तर्फे प्रतिवादी नं. ३ यांना चुकीची व बेकायदेशीर नोटीस पाठविलेली होती. तदनंतर प्रस्तुत वादींनी सदरचा चुकीचा व बेकायदेशीर स्वरूपाचा दावा प्रतिवादी नं. ३ यांचेविरूध्द दाखल केलेला आहे.

ई) प्रस्तुत दावेचे कामी यातील प्रतिवादी नं. ३ हे हजर झालेनंतर दि. ३०/०१/२०२६ इ. रोजी वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान आपसात तडजोड झालेने सदर प्रतिवादी नं. ३ यांनी गट नं. ७१४ मधील खरेदी घेतलेप्रमाणे व कब्जात असणारे क्षेत्र हे. ०.०१ आरचे क्षेत्रामध्ये जुने घर पाडून नविन घराचे बांधकाम चालू होते. सदर मिळकतीचे दक्षिण बाजुस वादी यांचे क्षेत्र असून वादी व प्रतिवादी नं. ३ यांनी आपआपले मिळकतीची मोजणी केलेनंतर प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांनी वादी यांचे क्षेत्रातील उत्तर बाजुस ९ इंच दक्षिण–उत्तर रूंदीची व पुर्व–पश्चिम ५६ फुट इतक्या लांबीचे जागेमध्ये स्वखर्चाने बांधकाम करूण त्यान गिलावा करून देणेचे ठरलेले असून तसेच सदर बांधकामास वादी यांनी कोणताही खर्च करणेचा नसून प्रस्तुत भिंतीसाठी वापरलेली जागा ही

Aundale 8/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

वादीचे मालकी वहिवाटीची राहील व सदर वादी व प्रतिवादी नं. ३ यांनी सदर भिंतीचा समान कायदेशीर हक्काने वापर करणेचा ठरले होते. त्याप्रमाणे तडजोडीनुसार प्रतिवादी नं. ३ यांनी आपले जागेची मोजणी करून कायदेशीरपणे बांधकाम केलेले आहे व सदरचे बांधकाम अंशत: पुर्ण झालेले आहे. त्यामुळे प्रस्तुत वादी व प्रतिवादी नं. ३ यांची तडजोड पुरसीस अभिलेखावर असलेने सदर नि. ५ चे अर्जास Estoppel या तत्वाची बाधा येते. त्यामुळे सदरचा मुळ दावा व नि. ५ चा अर्ज फेटाळून लावणे कायदयाचे दृष्टीने न्यायाचे व गरजेचे आहे.

प्रस्तुत वादी यांनी आपले दावा आर्जी कलम ३ मध्ये प्रतिवादी नं. ३ यांचे घर मोडकळीस आलेने घरे बांधून बांधकाम करत असलेचे मान्य व कबुल केले आहे, त्यामुळे प्रस्तुत कामी प्रतिवादी नं. ३ यांचे जुने घर जीर्ण व पडसर झालेने त्यांचे व त्यांचे कुटूंबियांचे जिवीतास धोका होता त्यामुळे सदरचे जुने घर पाडून नाईलाजास्तव बांधकाम करणे भाग पडले आहे याची संपूर्ण कल्पना वादी यांना असून देखील प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांची जागा हडप करणेच्या उद्देशाने सदरचा खोटा व लबाडीचा दावा दाखल केलेला आहे.

कलम १०

३) प्रस्तुत वादी यांनी नि. ५ चे कामी ब मधील दाद ही पुर्णपणे चुकीची व बेकायदेशीर स्वरूपाची आहे. प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांनी आपले खरेदी केलेल्या जागेत बांधकाम करीत असलेचे व बांधकाम करणे गरजेचे असलेने त्यांची कोणतीही हरकत नसलेचे वादी यांनी तडजोड

08/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

पुरसीसमध्ये मान्य केलेले असलेने प्रस्तुत नि. ५ चा अर्ज प्रतिवादी नं. ३ यांचेविरूध्द निरर्थक स्वरूपाचा असून तो फेटाळून लावणे न्यायाचे व गरजेचे आहे.

ऊ) प्रस्तुत कामी यातील प्रतिवादी नं. ३ यांचे घराचे बांधकाम स्लॅबपर्यंत झालेले असून प्रस्तुत प्रतिवादी यांनी साहीत्यास व बांधकाम मजुरांकरीता जवळपास सहा लाख रूपये हे सदर बांधकामामध्ये गुंतविलेले असून पुढील बांधकामाकरीता अंदाजे दोन लाख रूपयांचे साहीत्य आणलेले आहे. त्यामुळे बांधकामास मनाई मिळालेस प्रतिवादी नं. ३ यांचे आर्थिक स्वरूपाचे नुकसान होणार आहे. तसेच सदर घराचे बांधकाम पुर्ण न झालेस प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांना व त्यांचे मुलांना व नातवांना पावसाळयामध्ये निवाऱ्याचा प्रश्न निर्माण होवून अतोनात हाल होवुन त्यांचे जिवीताचा प्रश्न निर्माण होणार आहे, त्यामुळे प्रतिवादी नं. ३ यांचे कशानेही न भरून येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, त्यामुळे न्यायाचे दृष्टीने प्रस्तुत वादी यांचा नि. ५ चा अर्ज फेटाळून लावणे न्यायाचे व गरजेचे आहे.

ऋ) मुलतः वादीचा अर्ज बेकायदेशीर असून वादी यांनी सदरचा मनाईचा दावा यातील प्रतिवादी नं. ३ व इतर प्रतिवादी हे सदर दावा गट नं. ७१४ मध्ये असणारे सहहिस्सेदारांचे विरूध्द दाखल केलेला आहे. वास्तविकता सदर गट नं. ७१४ मध्ये प्रतिवादी नं. ३ यांचेसोबत खरेदी

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

दस्त नं. १२४९/२०२१ चे दस्ताप्रमाणे अन्य लोकांनी मिळकत खरेदी केलेचे स्पष्ट होते. तसेच सदर मिळकतीचा ७/१२ पाहता सदर गट नंबरमध्ये १११ मालक व कब्जेवहिवाटदार आहेत, त्यामुळे सदर कामी वादी मागत असलेले दादीबाबत अन्य सर्व सहहिस्सेदार यांना प्रस्तुत दावेत समाविष्ठ करणे कायदयाचे दृष्टीने गरजेचे होते व आहे. असे असताना प्रस्तुत सहहिस्सेदार असून सदर दावेत त्यांना पक्षकार म्हणून समाविष्ठ न केलेने सी.पी.सी. ऑ. १ रूल ९ चे तरतुदीची बाधा येत असलेने सदरचा मुळ दावा चालणेसच पात्र नसलेने अशा स्वरूपाचा अर्ज चालणेस पात्र नाही.

ए) प्रस्तुत कामी यातील वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन हे अस्पष्ट व मोघमपणे केलेले आहे. सदर वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन करताना संपूर्ण गट नं. ७१४ चे क्षेत्र नमुद केलेले नाही. तसेच सदर दावा मिळकतीचे वर्णन करताना दोन ठिकाणी क्षेत्र नमुद करून चतु:सिमा नोंद केलेले आहेत. तसेच वादी यांनी सादर केलेली कागदपत्रे पहाता वादीचे क्षेत्र व नमुद केलेल्या चतु:सिमा चुकीच्या असलेने दावा मिळकत ही स्पष्टपणे ओळखुन येत नाही. त्यामुळे प्रस्तुत मुळ दावेस व नि. ५ चे अर्जास मधील असणारे मिळकतीस सी.पी.सी. ऑ. ७ रूल ३ प्रमाणे दावा मिळकतीचे वर्णन अपुरे व चुकीचे असलेने सदरचा दावा व अंतर्गत असणारे सर्व प्रकारचे अर्ज चुकीचे व बेकायदेशीर आहेत.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kagal

ऐ) प्रस्तुत कामी यातील वादी यांनी मुळ दावेचे कामी निव्वळ कायम मनाई सारखी मागणी केलेली असून प्रस्तुतचा दावा निव्वळ कायम मनाईचा असून त्यासोबत कोणतीही अनुषंगीक मालकीबाबत परिणामी दाद न मागितलेने सदर वादी यांचे मालकीबाबत साशंकता निर्माण होत असलेने मा. नाम. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील Anathula Sudhakar v. P. Buchi Reddy by LRs and others, (2008 4/594) या न्यायनिर्णयाच्या तत्वाची बाधा येत असून सदरचा दावा व त्यातील अर्ज हे कायदेशीर तरतुदीत बसणारे नाहीत, त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळून लावणे गरजेचे आहे.

ओ) प्रस्तुत कामी वादी यांनी नमुद केलेप्रमाणे हद्द निश्चीत होवुन मिळणेबाबत मागितलेली दाद ही पुर्णपणे चुकीची व बेकायदेशीर असून स्पेसिफीक रिलीफ ॲक्टचे कलम ३६ व ३८ चे तरतुदी अंतर्गत येत नसलेने प्रस्तुत दावा व नि. ५ चा अर्ज फेटाळून लावणे न्यायाचे व गरजेचे आहे. त्यामुळे वादींना प्रतिवादी विरूध्द कोणतीही अशाप्रकारची दाद मागणेचा हक्क अगर.अधिकार नाही. यातील वादींनी सदरचा खोटा व लबाडीचा दावा व अर्ज करून प्रतिवादींना नाहक त्रास दिलेला असलेने वादींकडून प्रतिवादीना कॉम्पेंन्सेटरी कॉस्ट म्हणुन रक्कम रू. ५०,०००/– (रूपये पन्नास हजार फक्त) देणेबाबत आदेश होणे न्यायाचे व गरजेचे आहे.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

औ) प्रस्तुत कामी यातील वादी यांना दावेचा तपशिल चुकीचा नमुद केला असून सदरचा दावा हा चुकीचे आकारणीवर दाखल केलेला असलेने प्रस्तुत दावा अपुऱ्या कोर्ट फी मुळे चालणेस पात्र नाही.

अं) अशी सर्व वस्तुस्थिती असताना निव्वळ प्रतिवादी नं. ३ यांना त्रास देवून प्रतिवादीकडून जागा हडप करणेच्या अगर पैसे उकळणेच्या प्रयत्नात प्रस्तुत वादी आहेत.

अ:) प्रस्तुत दावेकामी व नि. ५ अर्जाकामी वादीस सकृतदर्शनी कथने नाहीत.

अॅ) न्यायाचे समबलत्व वादीचे बाजूने नसून प्रतिवादी नं. ३ यांचे बाजूने आहे.

ऑ) वादीनी दाखल केलेले नि. ५ मनाई अर्जामध्ये कायदेशीर सबळ कारणे नमुद नाहीत करीता वादीचा सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

क) वादी अभिलाषबुध्दीने खोटी कथने नमुद करून दुसऱ्याचे सांगणेवरून स्वार्थापोटी प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ विरूध्द मनाई बाबत खोटा दावा दाखल करून दाद मागणी करीत आहे, तरी वादींचा दावा खर्चासह नामंजुर करणेत यावा.

ख) वादींनी मनाई अर्जामध्ये मनाई करीता जी कारणे नमुद करीत आहे त्याबाबत मोघम व संदिग्ध उल्लेख केलेला आहे. मनाईबाबत सबळ व ठोस कारणे नमुद नाहीत तसेच काहीही कागदोपत्री पुरावा दावा व मनाई

Chandale 8/04/2016
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn..
Kagal

अर्जासोबत दाखल केलेला नाही तरी वादीचा मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

ग) वादीचा दावा तसेच मनाई अर्ज मंजुर झालेस प्रतिवादींचे कधीही भरून न येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे व त्यांना त्यांचे न्याय हक्कास मुकावे लागणार असून त्यांचेवर घोर अन्याय होणार आहे.

१९) **सबब विनंती की,**

१) वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

२) वादीने याकामी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल करून प्रस्तुत सर्व प्रतिवादी नं. ३ यांना नाहक खर्चात पाडल्याने कॉम्पेंन्सेटरी कॉस्ट म्हणुन रक्कम रू. ५०,०००/– (रूपये पन्नास हजार फक्त) वादीने प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांना देणेबाबत याच कामी आदेश व्हावा.

३) न्यायचे इतर योग्य ते सर्व आदेश याच कामी प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांचे वतीने व्हावेत.

४) न्यायचे इतर योग्य त्या सर्व दादी याचकामी प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांना मिळावेत.

५) करणपरत्वे कैफियत/म्हणणे दुरूस्तीस परवानगी व मुभा असावी.

येणेप्रमाणे कैफियत व म्हणणे असे.

कागल

ता. ०८/०४/२०२६.

मे. जा. व्हावे.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

## प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी नं. ३ सुजाता चंद्रकांत कांबळे सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वर नमुद कैफियत व म्हणणेमधील लिहीला संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु।। कागल ता. ०८/०४/२०२६.

सु. चं. कांबळे

## ॲफिडेव्हीट

मी यातील प्रतिवादी नं. ३ सुजाता चंद्रकांत कांबळे, व.व. ६०, धंदा: घरकाम व शेती, रा. कापशी, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपुर्वक ॲफिडेव्हीट करते की, वर नमुद कैफियत व म्हणणेमधील लिहीला संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु।। कागल.

ता. ०८/०४/२०२६.

सु. चं. कांबळे

ॲफिडेव्हीट करणार यांना मी ओळखतो.

ॲड. एन. जे. शिंदे

08/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

## प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी नं. ३ सुजाता चंद्रकांत कांबळे, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद कैफियत, म्हणणेमधील व त्याखालील ॲफिडेव्हीटमधील लिहीला संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु।। कागल ता. ०८/०४/२०२६.

सु. चं. कांबळे

Solemnly Affirmed before me by
Shri सुजाता चंद्रकांत कांबळे
who is
identified by Shri
whom I know personally
Dated 08/04/2026

Assistant Superintendent

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.08 15:48:43 +0900